दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक १० ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● सोमवार दि.११ एप्रिल २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# आम्हाला कळतंच नाही की हे देशाचे पंतप्रधान आहेत की गावचे सरपंच : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**भाजपच्या फ्लेक्सवर हल्ली ना अडवाणींचा फोटो ना अटल बिहारी वाजपेयींचा फोटो... सरपंचांना पण एकच फोटो, पंतप्रधानपदाला पण एकच फोटो, दुसरे फोटो गेलेत कुठे? आम्हाला कळतंच नाही की हे देशाचे पंतप्रधान आहेत की गावचे सरपंच... व्यक्ती नेमकी कोणत्या पदासाठी उभे आहे, हेच आम्हाला काहीवेळा समजत नाही, अशी फटकेबाजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली. कोल्हापूर उत्तर पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसच्या उमेदवार जयश्री जाधव यांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्र्यांनी सभा घेतली. यावेळी त्यांनी मोदी, फडणवीस, चंद्रकांत पाटील यांना जोरदार टोले लगावले.**



कोल्हापुरात शिरल्यानंतर हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा रुद्राक्ष हाती घेतलेलं भलंमोठं होर्डिंग्ज दिसायचं पण आज सत्तेसाठी शिवसेना एवढी लाचार झाली आहे की बाळासाहेबांना हिंदुहृदयसम्राट म्हणायला देखील घाबरते, होर्डिंग्ज-फ्लेक्सवरती हिंदुदृदयसम्राट अशी उपाधी दिसत नाही, कारण सत्ता टिकवायची आहे, अशी टीका काल विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी कोल्हापुरात बोलताना केली. फडणवीसांच्या याच टीकेला उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी भाजपच्या आजच्या फ्लेक्सवर कोण कोण असतं, याचं उदाहरण देताना मोदी, फडणवीस, चंद्रकांत पाटील यांना जोरदार टोले लगावले.

कोल्हापूर उत्तरची निवडणूक होतीय. तिथे भाजपच्या एकातरी फ्लेक्सवर अडवाणी, अटल बिहारी वाजपेयींचा फोटो आहे का? असा प्रश्न उद्धव ठाकरेंना कोल्हापूरकरांना विचारला. अडवाणींचा पत्ता ना अटलजींचा पत्ता, सरपंचांना पण एकच फोटो, पंतप्रधानपदाला पण एकच फोटो, दुसरे नेते गेलेत कुठे तुमचे?, अशी विचारणा उद्धव ठाकरेंनी केली.

# अंबा नदीपात्र कि डम्पिंग ग्राउंड?



**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्याची व-हाड जांभुळपाडा ग्रामपंचायत हद्दीतील अंबा नदीपात्रात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. सुधागड तालुक्याची जीवनवाहिनी असलेल्या अंबा नदीपात्रात घाण व कचरा, वाळू उपसा यामुळे नदीचे अस्तित्व देखील धोक्यात आले आहे.


जांभुळपाडा येथे वाहणार्या अंबानदी नदीप-त्रात कचरा आणून टाकला जात असल्यामुळे या नद्या आहेत की डंपींग ग्राऊंड हा प्रश्नच पडला आहे. एकीकडे पर्यावरणप्रेमींकडून नद्या वाचविण्यासाठी विविधस्तरावर प्रयत्न करण्यात येत आहेत.

परिसरातील नागरिक कचरा मोठ्या प्रमाणात नदीपात्रात आणून टाकण्यात येत आहे. प्रदूषित करण्यासाठी मोठा हातभार लावला जात आहे. बिनधास्त नदीपात्राचे डंपिंग ग्राऊंड करीत आहेत.नदीपात्रातील मोठ्या प्रमाणात कचरा साचलेला आहे. कायम दुर्गंधी असते. कचर्यासोबतच काटेरी झुडुपे, मोठी झाडे, कॅरिबॅग तसेच दारूच्या बाटल्या ढिग पडलेला आहे. नदीपात्रांमधून कचरा व पाणी प्रदूषित होण्याला नागरिकही तेवढेच जबाबदार आहेत. घरा-घरांमधून साठलेला कचरा प्लास्टीकच्या कॅरीबॅगमध्ये भरून या ठिकाणी आणून टाकण्यात येतो. त्यामुळे प्लास्टीकच्या पिशव्या ठिकठिकाणी अडकलेल्या दिसतात. नागरिकांनीही पर्यावरण व जलस्त्रोतांची काळजी घेण्याची गरज आहे. अशा प्रकारचा कचरा, प्लास्टीक पिशव्या दारुच्या बाटल्या या पात्रांत टाकू नये अशी अपेक्षा पर्यावरणप्रेमींकडून करण्यात येत आहे.

## बोरघाटात अपघाताची मालिका सुरूच

# मोटार सायकलस्वाराचा अपघात ; महिला जागीच ठार तर साथीदार जबर जखमी

**दै.रायगड नगरी । खोपोली**



मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर बोरघाट येथे सायमाळ जवळ मोटर सायकल वरून पुण्यावरून मुंबईकडे जाण्यासाठी निघाले असता सायमाल जवळ आल्यावेळी वळणावर बाईकचा तोल गेल्याने मागे बसलेली महिला गाडीवरून उडाल्याने रस्त्याच्या बाहेर उडाल्याने लोखंडावर आदळल्याने जबरदस्त जखमी होऊन उपचारासाठी घेऊन जात असताना महिलेचा मृत्यू झाला तर मोटारसायकल स्वार हाही जबर जखमी झाल्याने पुणे येथे उपचारासाठी पाठविण्यात आले आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी रविवारी दुपारी पुणे बाजूकडून मोटार सायकल क्र एम एच १७ सी इ ८१६४ वरून प्रशांत कहाणे वय २८ व स्नेहा सातदिवे वय २७ हे दोघेजण पुणे बाजू कडून मुंबई कडे जाण्यासाठी निघाले असता बोरघाटात सायंकाळी ४ वाजण्याच्या दरम्यान सायमाल जवळच्या वळणावर मोटार सायकलचा वेगात असल्याने तोल गेल्याने स्नेहा ही मागच्या मागेच मोटारसायकल वरून उडाल्याने रस्त्याच्या बाहेर फेकली गेल्याने त्याठिकाणी असणाऱ्या रॉड घुसल्याने जबर जखमी झाल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. तर मोटारसायकल चालक जबर जखमी झाल्याने त्याला पुणे येथे उपचारासाठी पाठविण्यात आले आहे.

# चोरलेल्या पार्टेकोंड सावंतकोंड दरम्यानच्या लोखंडी पूलाचे अवशेष घटनास्थळी हजर

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**



शहरातील पार्टेकोंड ते सावंतकोंड दरम्यानचा एक लोखंडी पूल चार दिवसांपूर्वी चोरीला गेल्याची तक्रार नगरपंचायत पोलादपूरकडून पोलादपूर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आल्यानंतर शनिवारी रात्रीच्या अंधारात काही अज्ञात व्यक्तींनी याच पुलाच्या ठिकाणी या पुलाचे अवशेष आणून टाकले आहेत. रविवारी ही बातमी पोलादपूर शहरात सर्वत्र पसरल्यानंतर हा विजय विरोधी नगरसेवकांचा की पोलादपूर पोलीसांच्या मध्यस्थीचा अशी चर्चा जोर धरू लागली. आरोपीला अटक करण्याऐवजी मुद्देमाल छिन्नविछिन्न स्वरूपात घटनास्थळी पुन्हा हजर झाल्याने सर्वश्रुत अज्ञात आरोपीविरोधात कायदेशीर कारवाई होण्याऐवजी त्याचा बचाव करण्यासाठी झालेल्या प्रयत्नांची सर्वत्र चर्चा सुरू आहे. दरम्यान, याठिकाणी भेट दिल्यानंतर पोलादपूर शहर काँग्रेस अध्यक्ष अमोल भुवड यांनी उपोषण आंदोलनाचा इशारा दिला आहे.

पोलादपूर ग्रामपंचायतीने पार्टेकोंड-सावंतकोंड भागातील विद्यार्थी तसेच ग्रामस्थांना पायी तसेच दुचाकीवरून शहराशी संपर्कात राहण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागामार्फत साधारणपणे ५०-६० फूट लांबीचा आणि ६ फूट रूंदीचा एक लोखंडी पूल बांधून घेतला होता. यानंतर नगरपंचायत अस्तित्वात आल्यावर या पार्टेकोंड सावंतकोंड भागात रस्ता करण्यात आल्याने या लोखंडी पुलावरील रहदारी बंद झाली. गेल्या काही वर्षांपासून वापराविना .../२

# असत्याचा मार्गावर न जाता, भगवंतांनी शिकवण दिलेला मार्ग अवघड जरी असला तरी तो मार्ग जीवन सुखकर करतो : ना.अदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**



प्रभू रामचंद्राने वानरसेनेला हाताशी धरून रावणावर विजय प्राप्त केला, भगवंताची शिकवण अवघड जरी वाटत असली तरी असत्याचा मार्गापेक्षा या अवघड मार्गाचा अवलंब केल्यास जीवन सुखकर होते असे प्रतिपादन राज्याच्या राज्य मंत्री तथा रायगडच्या पालकमंत्री ना.अदिती तटकरे यांनी अखंड जीवना कोळीवाडा येथील रामनवमी निमित्त आयोजित केलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात उपस्थित राहून केले. यावेळी स भ प सुखानंद स्वामी महाराज, स भ प अरुण कालेकर महाराज ,हरिश्चंद्र पावशे, काशिनाथ चुनेकर, चंद्रकांत वाघे एकनाथ वाघे निवृत्ती वाघे, भारत चोगले ,मोहन वाघे महेश चोगले आदी मान्यवर मंडळी व मोठ्यासंख्येने भाविक उपस्थित होते.

श्री भागवत धर्म प्रसारक श्री सद्गुरू अमृतनाथ स्वामी महाराज, श्री स्वानंद स्वामी महाराज व श्री प्रकाशनंद स्वामी महाराज यांच्या आश्रयाखाली पुरुषोत्तम पाटील महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होत असलेल्या ४५ वा अखंड हरिनाम सप्ताहात उपस्थित राहता आले याचे याचा मनस्वी आनंद होत आहे .गेली दोन वर्षे कोरोनाच्या सावटाखाली गेली. या पुढे कुठलेही संकट न येवो अशी मनोकामना अदितीताईनी शेवटी व्यक्त करून सर्वांना रामनवमीच्या शुभेच्छा दिल्या. रामनवमी सोहळा भेटीनंतर पालकमंत्री अदितीताई च्या हस्ते आसुफ येथील सभागृह .../२

# कर्जत तालुक्यात श्री राम नवमी उत्साहात साजरी



**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील अनेक गावांमध्ये श्री राम मंदिरे आहेत. या मंदिरांमध्ये राम जन्मोत्सवा निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. गेली दोन वर्षे कोरोनाच्या संकटामुळे हा उत्सव साजरा करण्यात आला नव्हता त्यामुळे यंदा रामजन्मोत्सव अधिक चांगल्या पद्धतीने साजरा करण्यात आला.


यंदा रविवार असल्याने सर्वच ठिकाणी भाविकांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शवून प्रतिसाद दिला. तालुक्यातील दहिवली, साळोख, बेंडसे, कडाव, माथेरान, नेरळ कर्जत येथील कपालेश्वर मंदिर आदी ठिकाणी राम नवमी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दहिवली येथील श्री विठ्ठल संस्थांच्या श्री राम मंदिरातही मोठ्या प्रमाणात गर्दी होती. श्री राम पंचतनच्या मंदिरात पहाटे ब्रह्मचैतन्य .../२

# मॉनिटरचा अपहार करुन फरार झालेल्या कंटनेर चालकाचा पोलिसांकडून शोध सुरु

**दै.रायगड नगरी । पनवेल**

चेन्नई येथून तळोजा येथे पोहोचवण्याची जबाबदारी सोपविलेल्या कंटेनर चालकाने कंटेनेर मधील तब्बल २६ लाख रुपये किंमतीचे डेल कंपनीच्या मॉनिटरचा अपहार केल्याचे उघडकीस आले आहे. शमीम खुर्शीद खान (२५) असे या कंटेनर चालकाचे नाव असून तळोजा पोलिसांनी त्याच्या विरोधात अपहाराचा गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

चेन्नई येथील ब्ल्यु डार्ट कंपनीचे मॅनेजर रणजित कुमार यांनी गत ३१ मार्च रोजी चैन्नई येथून तळोजा येथे ८०० डेल कंपनीचे मॉनिटरने भरलेले बॉक्स व २६ इतर मॉनिटरचे बॉक्स पोहोचविण्याची जबाबदारी सेंच्युरी कार्गो कॅरीअर प्रा.लि. या कंपनीच्या चेन्नई येथील कार्यालयाला दिली होती. त्यानुसार सेंच्युरी कार्गो कंपनीने शौकीन सनाब खुर्शीद खान या कंटेनर चालकाला ३२ फुटी ट्रेलरमध्ये मॉनिटरचे बॉक्स भरुन ते तळोजा येथे पोहोचविण्यास सांगितले होते. मात्र सदर कंटेनरवर शौकिन खान हा चालक म्हणून न जाता, त्याने त्याचा भाऊ शमीम खान याला पाठवुन दिले. दि.१ एप्रिल रोजी सायंकाळी शमीम याने चेन्नई येथून कंटेनरमध्ये मॉनिनटरचे बॉक्स भरल्यानंतर तो तळोजा येथे जाण्यासाठी निघाला होता. .../२



# आजारी शेजारी

करोनाचा कहर संपून वेगाने प्रगती करण्याच्या काळात आपले दोन शेजारी अस्वस्थ आणि अशांत असावेत, हे नुसते कटकटीचेच नाही, तर भारतावर अनेक अंगांनी ताण आणणारे आहे. खाली दक्षिणेत श्रीलंकेत स्थिर सरकार असूनही जवळपास बेबंदशाहीचा माहोल आहे, तर पश्चिमेकडे पाकिस्तानात सर्वशक्तिमान लष्कर आणि आयएसआय यांनी इम्रान खान यांच्या सरकारला दिलेले खांदे काढून घेण्याचे ठरविलेले दिसते. पाकिस्तानात पुढच्या आठ–दहा दिवसांत काय होईल, हे काहीही सांगता येत नाही. फक्त गेल्या काही वर्षांत लष्कराने प्रत्यक्ष सत्ता ताब्यात घेण्याऐवजी संसदीय लोकशाहीचे सोंग चालू ठेवून, कासरा हातात ठेवण्याचे कसब साधले आहे. असे केल्याने जगाचा रोष पत्करावा लागत नाही; त्यामुळे लष्करशहा कदाचित थेट सिंहासनावर बसणारही नाही. तेथे याच नॅशनल असेंब्लीमधून नवे सरकार करायचे, की इम्रान खान यांनी घोषणा केल्याप्रमाणे नव्या निवडणुका घ्यायच्या, याचा निकाल आता पाकिस्तानी सर्वोच्च न्यायालय घेणार आहे. ही सुनावणी मंगळवारी असून, त्याच दिवशी निकाल लागल्यास आश्चर्य वाटायला नको. इम्रान खान संघर्षाच्या भूमिकेत दिसतात. त्यांनी लष्कराविरुद्ध पुकारलेला हा लढा कितपत लढता येईल, हा मोठा प्रश्न आहे. इम्रान यांनी आता हंगामी पंतप्रधान म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश गुलझार अहमद यांचे नाव पुढे केले आहे. इम्रान खान यांना गुलझार अहमद यांच्या निगराणीखाली नव्या निवडणुका हव्या आहेत. अर्थात, ते आता तेथील सर्वोच्च न्यायालयावर अवलंबून आहे. पाकिस्तानचे सर्वोच्च न्यायालय अनेकदा लष्कराला अनुकूल निकाल देते असे म्हटले जात असले, तरी काही नेक न्यायमूर्तींनी याआधी पाकिस्तानी लष्कर व सत्ताधाऱ्यांना जबर तडाखे दिले आहेत. पाकिस्तानात इतक्या वर्षांमध्ये कोणत्याही संसदीय, घटनात्मक आणि न्यायालयीन परंपरा घट्ट मुळे रुजवू शकलेल्या नाहीत, ही खरी अडचण आहे. त्यामुळेच, तेथे आज अध्यक्ष, पंतप्रधान, नॅशनल असेंब्लीचे सभापती आणि न्यायालय यांच्यात जो पत्रव्यवहार किंवा विचारविनिमय चालू आहे, त्याला काहीही अर्थ नाही. तो अर्थ एक लष्करशहा क्षणात शून्यवत करू शकतो. पाकिस्तानातील अस्थैर्य भारताला नेहमीच कटकटीचे ठरते. त्यातच, पलीकडे अफगाणिस्तानात धर्मांध तालिबानी सत्तेत आहेत. या दोन्हींचा परिणाम केवळ काश्मीरवर नव्हे, तर एकंदरीतच भारताच्या स्थैर्यावर झाल्याशिवाय राहणार नाही. हे कमी म्हणून की काय, श्रीलंकेतील स्थिती क्षणाक्षणाला हाताबाहेर जाते आहे. तेथेही अध्यक्ष म्हणून बसलेले गोताबया राजपक्ष हे एकेकाळचे लष्करशहाच आहेत. त्यांना तमिळी वाघांचे निर्दालन केल्याचा अनुभव आहे; त्यामुळे सध्या त्यांनी संचारबंदी लागू केली आहे. उद्या प्रसंगी ते तांदूळ आणि गॅस सिलिंडरसाठी निदर्शने करणाऱ्या निष्पाप नागरिकांवर गोळीबार करायलाही मागेपुढे पाहणार नाहीत. श्रीलंकेतील लोकशाहीची वाटचाल बरीच निकोप चालू होती; मात्र राजपक्ष कुटुंबाने देशातील सगळी सत्तास्थाने आपल्या ताब्यात घेतली असून, मनमानी कारभाराने देशाला दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभे केले आहे. आर्थिक संकटात सापडलेल्या श्रीलंकेला पुन्हा उभे करणे, हे सोपे आव्हान नाही. त्यातच, चीनला भारतीय उपखंडातील प्रत्येक देशाला कायमचे अंकित करून भारताला शह द्यायचा आहे. चीनने हा खेळ नेपाळ, बांगलादेश, श्रीलंका, पाकिस्तान, भूतान या सर्वच देशांमध्ये चालविला आहे. या साऱ्या पार्श्वभूमीवर करोनोत्तर युगात भारतासमोर केवळ संरक्षणविषयक नव्हे, तर आर्थिक आव्हानेही उभी ठाकणार आहेत. श्रीलंकेला मदत केली नाही, नेपाळला चुचकारले नाही, भूतानला सांभाळले नाही आणि बांगलादेशाशी सख्य राखले नाही, तर भारताच्या चारही बाजूंनी संघर्षशील शेजाऱ्यांचा वेढा निर्माण होईल. गेल्या काही दिवसांत इम्रान खान आणि लष्करप्रमुख कमर जावेद बाज्वा हे आलटून–पालटून भारताला अनुकूल विधाने करीत आहेत. पाकिस्तानी राज्यकर्ते आणि लष्कराने कायम भारतकेंद्री राजकारण केले. भारतद्वेषी राष्ट्रवाद जोपासला; त्यामुळे देशात अस्थैर्य आले, की भारताला काहीही करून मध्ये आणले जाते. इम्रान यांच्या नॅशनल असेंब्लीतील प्रदीर्घ भाषणातही हे दिसले होते. या वक्तव्यांना काहीही अर्थ नाही. उद्या पाकिस्तानात सार्वत्रिक निवडणूक झाली, तर प्रचाराचा सारा रोख क्षणार्धात भारताच्या विरोधात वळू शकतो. आज पाकिस्तान आणि श्रीलंका या वेगवेगळ्या आजारांनी ग्रासलेल्या शेजाऱ्यांचा भारताला किती उपद्रव होऊ शकतो आणि या स्थितीचा चीन कितपत लाभ उठवू शकतो, ही देशाच्या दृष्टीने सगळ्यांत चिंतेची बाब आहे. सगळा भारतीय उपखंड हा राष्ट्रांच्या सीमांपलीकडे एका अतूट जैविक नात्याने जोडला गेला आहे. त्यामुळेच, कोणताही एक देश अशांत झाला, तरी त्याचा परिणाम इतर सहा–सात देशांवर होत असतो. यातून मार्ग काढण्यात भारताचीच भूमिका महत्त्वाची राहणार आहे. केंद्र सरकार तशी पावले टाकत असेल, अशी अपेक्षा आहे.

# पोलादपूरच्या जनतेने पुन्हा सत्तेत आणले म्हणून श्रीरामजयंतीनिमित्त नवीन जॅकवेलच्या कामाद्वारे उतराई होणार : आ.भरतशेठ गोगावले



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

पोलादपूर शहरातील जनतेने मोठ्या प्रमाणात नगरसेवक निवडून आणत पुन्हा एकदा सत्तेत आणल्याचे उपकार फिटणार नाहीत परंतू उतराई होण्यासाठी महापुरात वाहून गेलेल्या जुन्या जॅकवेलच्या ठिकाणी नवीन जॅकवेल बांधून जनतेचे उतराई होणार, असे मत महाड विधानसभा मतदार संघाचे आमदार भरतशेठ गोगावले यांनी येथे केले.

रविवारी श्रीरामनवमीच्या मुहूर्तावर आ.भरत गोगा–वले यांच्याहस्ते पोलादपूर तालुका संपर्कप्रमुख किशोर जाधव, राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे, नगराध्यक्षा सोनल गायकवाड, उपनगराध्यक्ष नागेश पवार, पाणीपुरवठा सभापती प्रसाद इंगवले,माजी नगराध्यक्षा अश्विनी गांधी, माजी नगराध्यक्ष राजन पवार, नगरसेवक सिध्देश शेठ, सुनीता पार्टे, महिला बालकल्याण सभापती अस्मिता पवार, प्रकाश गायकवाड, अमरदीप नगरकर, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, लक्ष्मण मोरे तसेच अन्य पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी आ.गोगावले यांनी फिल्टरेशन प्लांटसहित नळपाणी योजना सुरू करण्यासाठी प्रयत्न असून आगामी दोन वर्षांमध्ये सर्वाधिक कामे पोलादपूर नगरपंचायतीमध्ये करून ही जॅकवेल १ कोटी १७ लाखाची होण्याकामी नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्यामार्फत आपण पाठपुरावा करून आणली असल्याचे सांगितले. यावेळी नगराध्यक्षा सोनल गायकवाड यांच्याहस्ते भुमिपूजन करण्यात आले. पोलादपूर नगरपंचायतीच्या जुनी जॅकवेल वाहून गेल्याच्या ठिकाणी सावित्री नदीपात्रामध्ये नवीन जॅकवेलसाठी पुन्हा बांधकाम सुरू होणार आहे. यावेळी नळपाणी पुरवठा समितीचे सभापती प्रसाद इंगवले यांनी सर्वांचे आभार मानले.

# माथेरानमध्ये पोलीस दलाचे पथसंचलन

**दै.रायगड नगरी । माथेरान**

आगामी काळामध्ये येणाऱ्या सण उत्सवांच्या पार्श्वभूमीवर कायदा सुव्यवस्था अबाधित रहावी ह्या करिता माथेरान पोलिसांच्या वतीने काल सायंकाळी येथील विविध नगरांमध्ये पथसंचलन करण्यात आले.

माथेरान हे एक पर्यटन क्षेत्र आहे येथे विविध जातीची धर्मांची लोक येत असतात व सध्या येऊ घातलेल्या अनेक उत्सवांमुळे कायदा सुववस्था अबाधित अबाधित राहावी ह्यासाठी माथेरान पोलीस नेहमीच सतर्क असतात आताही रामनवमी, रमजान,गुड फ्रायडे, डॉ. बाबसाहेब आंबेडकर जयंती व छत्रपती शिवाजी महाराज पुण्यतिथी सारखे सण व उत्सव लागून येत असल्याने



माथेरान मधील स्थानिक व पर्यटकांमध्ये जनजागृती व कायदा सुववस्था अबाधित राहावी ह्यासाठी माथेरान पोलिसांनी संपूर्ण गावामध्ये रूटमार्च केला.

ह्यावेळी राम मंदिर चौकामधून ड्रिलचे प्रदर्शन करून छत्रपती शिवाजी नगर, मुस्लिम मोहल्ला पंचशील नगर, वाल्मिकी नगर,इ ंदिरा नगर व माथेरानचे प्रवेशद्वार दस्तुरी नाका येथे हे संचलन करण्यात आले. माथेरान मध्ये अशा प्रकारचे संचलन पहिल्यांदाच होत असल्याने येथील नागरिकांमध्ये उत्सुकता दिसून येत होती व कोरोना काळातील पोलिसांच्या दहशतीचे ह्यावेळी सर्वांना आठवण झाली पण पोलिसांनी सर्वांना हे तुमच्या सुरक्षिततेसाठी असल्याची खात्री दिल्यानंतर सर्वच ठिकाणी त्यांचे नागरिकांनी स्वागत करून सहकार्याचे आश्वासन दिले. एपीआय शेखर लव्हे यांनी सांगितले की, माथेरान हे शांत पर्यटनस्थळ आहे व ह्याची शांतता अबाधित राहण्यासाठी व येणाऱ्या काळातील उत्सव सणांमध्ये नागरिकांना कायदा सुव्यवस्थेची माहिती व धाक असावा ह्या दृष्टिकोनातून हा रूटमार्च आयोजित करण्यात आला होता.

# रेल्वे दिनी नानाप्रेमींचे ठाण्यात आंदोलन

**दै.रायगड नगरी । ठाणे**

मुंबई सेंट्रल टर्मिनसचे नाना शंकरशेट मुंबई सेंट्रल टर्मिनस असे नामकरण करावे यासाठी सरकारचे लक्ष वेधण्यासाठी तमाम नानाप्रेमी रेल्वे दिनी १६ एप्रिल रोजी ठाणे रेल्वे स्थानकासमोर मुक निदर्शने करणार आहेत.

नाना शंकरशेट मुंबई सेंट्रल टर्मिनस असे नामकरण करण्यासाठी नाना शंकरशेट प्रतिष्ठान व दैवज्ञ समाजोन्नती परिषद गेली अनेक वर्षे सरकारकडे सातत्याने पाठपुरावा करत आहे. राज्यात उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडी सरकार स्थापन झाल्यानंतर हा प्रस्ताव विधीमंडळाने मंजूर करून तो केंद्र सरकारकडे पाठविला. मात्र त्यानंतर



नाना शंकरशेट प्रतिष्ठानच्या शिष्टमंडळाने सर्वपक्षीय खासदारांनाही निवेदने देवून याबाबत संसदेत आवाज उठविण्यासाठी विनंती केली होती. मात्र केंद्र सरकाने दोन वर्षात या नामकरणाबाबत कोणतीही हालचाल केलेली नाही.

मुंबई आद्य शिल्पकार, थोर समाजसुधारक आणि हिंदुस्थानी रेल्वेचे जनक नाना शंकरशेट यांचे नाव लवकरात लवकर मुंबई सेंट्रल टर्मिनसला देण्यात यावे. याकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी नाना शंकरशेट प्रतिष्ठान, ठाणे दैवज्ञ ब्राह्मण समाज आणि ठाणे रेल्वे प्रवासी संघटना १६ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता ठाणे रेल्वे स्थानकासमोर मुक आंदोलन करणार असल्याची माहिती प्रतिष्ठानचे सरचिटणीस अ‍ॅड.मनमोहन चोणकर यांनी दिली.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## चोरलेल्या पार्टेकोंड सावंतकोंड दरम्यानच्या लोखंडी पूलाचे अवशेष घटनास्थळी हजर

असलेल्या या लोखंडी पुलाकडे रस्त्यावरून जाणाऱ्या व येणाऱ्या स्थानिक लोकांचे लक्ष असे. सोमवारी सायंकाळी पोलादपूर नगरपंचायतीचा लोकप्रतिनिधी याठिकाणी येऊन पाहणी करून गेला आणि रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास एक ओळखीचे वाहन येऊन गेले. दुसऱ्या दिवशी मंगळवारी हा लोखंडी पूल नटबोल्ट कापून चोरीला गेल्याचे स्थानिक ग्रामस्थांच्या लक्षात आले. याबाबत पोलादपूर नगरपंचायतीचे विरोधी गटनेता दिलीप भागवत, नगरसेवक स्वप्नील भुवड आणि अ‍ॅड.सचिन गायकवाड यांच्या निदर्शनास ही बाब स्थानिक ग्रामस्थांनी आणून दिल्यानंतर या चोरीस गेलेल्या लोखंडी पुलासंदर्भात माहिती घेतल्यानंतर रायगड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने हा पूल बांधल्यानंतर नगरपंचायतीच्या निर्मितीनंतर हा पूल नगरपंचायतीकडे वर्ग केल्याचे समजून आल्याने पोलादपूर नगरपंचायतीच्या विरोधी गटनेते दिलीप भागवत यांच्या लेटरपॅडवरून मुख्याधिकारी पोलादपूर नगरपंचायत यांना सदर लोखंडी पुलाच्या चोरीसंदर्भात कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

पोलादपूर नगरपंचायतीचे प्रशासकीय अधिकारी महादेव सरबंळे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार यासंदर्भात पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा र.नं.२६–२०२२ नुसार नोंद करून याप्रकरणी पोलीस हवालदार वाय.व्ही.चव्हाण यांनी सहायक पोलीस निरिक्षक प्रशांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली दि.७ एप्रिल २०२२ रोजी रात्री पावणेबारा वाजण्याच्या सुमारास भा.दं.वि.३७९, ४२७ कलमान्वये अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. यानंतर पोलादपूर पोलीसांनी विरोधी गटनेता दिलीप भागवत आणि नगरसेवक स्वप्नील भुवड यांचे जबाबही नोंदविले.

पोलादपूर पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर शनिवारी रात्रीपासून सुरु झालेल्या हालचालींचा अशाप्रकारे काल शेवट झाल्याने आज रविवारी घटनास्थळी विरोधी गटनेते दिलीप भागवत, नगरसेवक संतोष चव्हाण, सचिन दुदूस्कर, अभि गरूड, काँग्रेस शहराध्यक्ष अमोल भुवड, दिनेश पाटील, युवक काँग्रेस विधानसभा अध्यक्ष अ‍ॅड. सचिन गायकवाड आदींनी चोरीला गेलेला लोखंडी पुल परत जागेवर तुकडेतुकडे स्वरूपात आल्याचे पाहण्यासाठी भेट दिली.

यावेळी काँग्रेस पोलादपूर शहर अध्यक्ष अमोल भुवड यांनी, पोलादपूर पोलीस ठाण्याला या चोरीप्रकरणी कोणते वाहन होते, कोण कोण सहभागी होते, याबाबत सर्वच माहिती काँग्रेसच्या नगरसेवकांनी पोलादपूर पोलीस ठाण्यात जबाबावेळी दिली असताना पोलीसांकडून चोराला झालेल्या सहकार्यामुळे ही कोणत्या प्रकारची लोकशाही आहे हुकूमशाही आहे अथवा अन्य कोणती शाही आहे, हे तपासले पाहिजे. या सर्व प्रकारात पोलीसांचा वरदहस्त आहे हे स्पष्ट दिसून येत आहे. एकूणच प्रकरणात आरोपीला अटक न झाल्यास तसेच सदरचे प्रकरण कायद्याच्या कक्षेत येऊन सुद्धा रफादफा झाल्यास उपोषण व आंदोलनाचा मार्ग अवलंबिण्यात येईल, असा इशारा दिला.

नजिकच्या काळात पोलादपूर पोलीसांनी आरोपीला पाठीशी घालून हे प्रकरण रफादफा केल्यास काँग्रेसकडून शहरामध्ये मोठ्याप्रमाणात आंदोलन होण्याच्या शक्यतेमुळे आता पोलादपूर पोलीसांच्या या धोरणामुळेच कायदा आणि सुव्यवस्था धोक्यात येण्याची चिन्हे दिसून येऊ लागली आहेत.

## अवघड जरी असला तरी तो मार्ग जीवन सुखकर करतो : ना.अदिती तटकरे

दुरुस्त करणे कामाचे तसेच निगडी ते निगडी कोंड रस्ता करणे, कोलमांडला ते केलेची वाडी रस्त्याचे कामाचे तसेच गडबवाडी येथील स्मशानभूमी व निवारा शेड तसेच बागमांडला येथील बागमांडला दांडा ते कोळीवाडा पथदिव्याची लाईन करणे कामाचे, वावेलवाडी येथील मुख्य रस्ता ते वावेलवाडी रस्ता करणे कामाचे उदघाटन करण्यात आले.

उद्घाटन समयी त्यांच्या समवेत तालुका अध्यक्ष दर्शन विचारे, जी प सदस्य प्रगती अदावडे, पं स सदस्य मंगेश कोमनाक, तालुका युवक अध्यक्ष सिद्धू कोसबे, हरेश्वर सरपंच अमित खोत, तालुका समन्वय अध्यक्ष हिदायत कुदृते बागमांडला सरपंच अनघा भाटकर आदी मान्यवर उपस्थित होते. आम्ही सुचवलेली कामे तसेच मंजूर केलेली कामे काहींच्या सांगण्याने केवळ आकसापोटी लोक नाकारत होते, आता काळ बदलला आहे विकास कामात मागे राहिलेला ग्रामीण भाग आमच्या माध्यमातूनच होऊ शकतो याची खात्री झाल्यानेच लोक आमचे गावागावात स्वागत करत आहेत, याचा असल्याचे विविध विकासकांमाच्या  उदघाटन समयी बोलताना ना.अदिती तटकरे यांनी सांगितले.

## कर्जत तालुक्यात श्री राम नवमी उत्साहात साजरी

उपासना केंद्राच्या सदस्यांनी काकड आरती केली त्यानंतर महापूजा, अभिषेक, रामजन्माचा सोहळा संपन्न होतांना पाळणा, रामरक्षा, रामपाठ झाल्यानंतर श्री रामच्या मूर्तीचे दर्शन प्रत्येक भाविकाला जागेवर नेवून देण्यात आले. कोंकण आळीतील विजय जिनगरे यांच्या निवासस्थानी तर साळोख येथील कृष्णा कदम यांच्या निवासस्थानीसुद्धा रामनवमी उत्सव संपन्न झाला. कडाव येथील श्री बाल दिगंबर गणेश संस्थानच्या श्री राम मंदिरात ह. भ. प. श्रीराम पुरोहीत यांनी तीन दिवस प्रवचन सेवा केली.

महाप्रसादा नंतर श्रीरामाची पालखीतून मिरवणूक काढण्यात आली. या प्रसंगी अध्यक्ष बळवंत घुमरे, सचिव विलास दांडेकर, खजिनदार मनोहर दांडेकर, भालचंद्र घुमरे, सुधीर पोतदार, विलास मुरकुटे, मोहन पोतदार आदींसह दहीवलीकर मोठ्या संख्येने उपस्थित होते. बेंडसे, कडाव, साळोख, माथेरान येथेही राम नवमी उत्साहात साजरी करण्यात आली.

## मॉनिटरचा अपहार करुन फरार झालेल्या कंटनेर चालकाचा पोलिसांकडून शोध सुरु

मात्र यादरम्यान, त्याने कंटेनरमधील तब्बल २६ लाख रुपये किंमतीचे ७० डेल कंपनीचे मॉनिटर बाहेर काढुन त्यांचा अपहार केला.

त्यानंतर त्याने ३ एप्रिल रोजी सायंकाळी त्याची मुलगी मयत झाल्याने मालाचा कंटेनर कर्नाटक धारवाड टोलनाक्याजवळील मेवाती ढाब्याजवळ थांबवुन आपल्या गावी जात असल्याचे कार्गो कंपनीतील सुपरवायझरला फोनवरुन सांगितले. त्यामुळे कार्गो कंपनीने सदरचा कंटेनर तळोजा येथे आणण्यासाठी अबिद खान याला धारवाड येथे पाठवुन दिले. अबिद खान हा त्याच दिवशी रात्री धारवाड येथे पोहोचल्यानंतर त्याने कंटनेचे सील व्यवस्थीत असल्याची खात्री करुन सदर कंटेनर दुसऱ्या दिवशी रात्री तळोजा येथे आणला. त्यानंतर कंटनेर मधील माल बाहेर काढण्यात आल्यानंतर त्यातील ७० डेल कंपनीचे मॉनिटर कमी असल्याचे आढळुन आले. त्यानंतर चालक शमीम खुर्शीद खान यानेच सदर कंटेनर मधील मॉनिटरचा अपहार करुन पलायन केल्याचे लक्षात आल्यानंतर कार्गो कंपनीच्या अधिकाऱ्याने तळोजा पोलीस ठाण्यात शमीम विरोधात तक्रार दाखल केली.

# श्री साई बाबा मंदिर येथे श्री रामनवमी उत्सवाचे औचित्य साधून विविध आध्यामिक कार्यक्रम संपन्न



**दै.रायगड नगरी । पनवेल**

परमपुज्य सदगुरु श्री साई नारायण बाबा यांच्या आर्शिवादाने पनवेल येथील श्री साई बाबा मंदिर येथे आज  श्री रामनवमी उत्सवाचे औचित्य साधून  विविध आध्यामिक कार्यक्रम संपन्न झाले .

त्यानिमित्त प्रथमच श्री रामकथा (श्री रामचरित्र मानस पाठ) चे आयोजन करण्यात आले होते सदर श्री रामकथा पुज्य श्री दिव्यांशु महाराज –अयोध्या व त्यांच्या सहकार्यांनी सादर केली . या निमीत्ताने आज पनवेल महापालिकेच्या महापौर डॉ. कविता चौतमोल व पत्रकार संजय कदम यांच्या हस्ते उपस्थित पंडितांना जीवनावश्यक  वस्तूंचे वाटप करण्यात आले तसेच आज सकाळ पासूनच १४० विधवा माता भगिनींना महिन्याचे राशन  व ११० पंडितांना भोजन देण्यात आले . पहाटे  यज्ञ व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती श्री साई नारायण बाबा आश्रमव श्री भगवती साई संस्थान(रजि.)पनवेल चे चेअरमन खेमचंद गोपलानी, को–ऑडरीनेटर रामथदानी व सचिव रामलाल चौधरी यांनी दिली. हजारो भाविकांनी  श्री साई बाबांचे व  श्री साई नारायण बाबा चे आर्शिवाद घेतले.

# नांदगावच्या अमृतेश्वर मंदिरात रामनवमी उत्साहात साजरी



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील नांदगावच्या अमृतेश्वर मंदीरात रामनवमी उत्साहात साजरी करण्यात आली. यादिवशी अमृतेश्वर मंदीरात पुजारी पांडुरंग गाणार यांच्या हस्ते प्रभू श्रीराम मुर्तीची विधिवत पूजा अर्चा व अभिषेक करण्यात आला.

अमृतेश्वर मंदिर पंचकमिटी अध्यक्ष उमाकांत चोरघे, उपाध्यक्ष कुसूमाकर घुमकर, विद्याधर चोरघे, सचीव प्रभाकर निरकर, खजीनदार निरकरगुरुजी, सदस्य विष्णू नागांवकर, सचीन पाटील, जितेंद्र भाटकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे औचित्य साधून यावेळी अमृतेश्वर मंदिर पंचकमिटी तर्फे रायगड भूषण पुरस्कार मिळालेल्या किर्तनकार धनंजय बुवा गद्रे, विद्याधर चोरघे तसेच दानशूर व्यक्तिमत्त्व महेश कोतवाल यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः सुनील कृष्णाजी पोतदार यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ संपादक : राकेश दिलीप पितळे R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## पनवेलमध्ये पुन्हा हातगाड्यांचे बस्तान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल उरणनाका ते टपालनाका येथे दररोज २० ते २५ अनधिकृत हातगाड्या लागत आहेत. यामुळे नित्याच्या वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. त्याचा नागरिकांना त्रास होत आहे. पुन्हा एकदा शहरात हातगाड्या सुरु झाल्याचे चित्र दिसत आहे. मात्र महापालिकेचे अतिक्रमण विभाग याकडे बघूनही कारवाई का करत नाही असा सवाल उपस्थित झाला आहे.

पनवेल शहरात ठिकठिकानी हातगाडी चालकानी बस्तान बसविण्यास सुरुवात केली आहे. पनवेल शहराची प्रमुख बाजारपेठ समजल्या जाणाऱ्या टपाल नाका येथून उरण नाक्यापर्यंत फळे आणि भाज्या विक्री करणाऱ्या हातगाड्या उभ्या असतात. या गाड्या पुढे उरण नाक्यावर प्रचंड गर्दी करतात. येथेच मच्छी विक्रेते रस्त्यावर बसलेले असतात. रिक्षा थांबा देखील येथेच असल्याने नागरिकांच्या गाड्या रस्त्याच्या दुतर्फा हॉस्पिटलपर्यंत लागलेल्या असतात. त्यामुळे शहरातील या मुख्य रस्त्यावर वाहतूक कोंडी कायम असते. त्यामुळे पुन्हा एकदा पनवेल परिसर बेकायदा हातगाड्याच्या विळख्यात सापडलेला दिसत आहे. रस्त्यावर पुन्हा एकदा हातगाड्या सुरु झाल्या आहेत. मात्र अतिक्रमण विरोधी पथक यांच्यावर कारवाई करताना दिसत नसल्याने त्यांचे प्रमाण वाढू लागले आहे. पनवेल महापालिकेची अतिक्रमण विरोधी मोहीम सुस्त झाली असल्याचे या निमित्ताने दिसत आहे. हातगाड्यांचे शहर ही पुसलेली ओळख पुन्हा पनवेल शहरात डोके वर काढू लागली आहे.

## मुरूडच्या श्री काळभैरव मंदिरात रामनवमी उत्साहात साजरी



**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड शहरातील कित्ते भंडारी समाजाच्या श्री काळभैरव मंदीरात रामनवमी उत्साहात साजरी करण्यात आली. तब्बल दोन वर्षांच्या प्रदीर्घ कोरोणा काळानंतर या मंदिरात मोठ्या संख्येने श्रीराम भक्त उपस्थित होते.

यादिवशी बुवा सुधाकर पाटील यांनी कथन केलेल्या प्रभू श्रीरामाच्या चरित्राचे सुमधुर स्वरातील कथेने श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून टाकले. श्री काळभैरव मंदीराचे पुजारी सुधाकर खेडेकर यांच्या हस्ते प्रभू श्रीराम मुर्तीची विधिवत पूजा अर्चा व अभिषेक करण्यात आला. त्यानंतर श्री राम मुर्ती विधीवत पाळण्यात ठेवून सुवासिनींच्या हस्ते पाळणा घेण्यात आला. काळभैरव मंदिर पंचकमिटी, अध्यक्ष व विश्वस्त मंडळाने या सोहळ्याचे आयोजन केले होते.

# पनवेल चांद्रसेनीय कायस्थ प्रभु समाजाच्या वतीने श्रीरामजन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एप्रिल रोजी रामनवमीच्या निमित्ताने पनवेलच्या चांद्रसेनीय कायस्थ प्रभु समाजाच्या वतीने श्रीराम जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विशेष म्हणजे या रामजन्मोत्सव सोहळ्याला शंभर वर्षांहून अधिक वर्षांची परंपरा आहे. सुप्रसिद्ध उद्योजक राजुशेठ गुप्ते यांच्या पुढाकाराने पूर्णत्वास आलेल्या लक्ष्मीनारायण मंदिर जीर्णोद्धार प्रक्रियेमुळे,नवीन मंदिरात प्रथमच हा सोहळा होत असल्याने यंदाच्या रामजन्मोत्सव उत्सवाला प्रचंड उत्साहाची किनार होती. पनवेलच्या चांद्रसेनीय कायस्थ प्रभु समाजातील अनेक मान्यवरांची या सोहळ्याला उपस्थिती होती.



पनवेल मधील चांद्रसेनीय कायस्थ प्रभु समाजाचे लक्ष्मीनारायण मंदिर,प्रभु आळी, छत्रपती शिवाजी पथ येथे आहे. या मंदिरात विविध धार्मिक सोहळे मोठ्या उत्साहात साजरे करण्यात येतात. यापैकी एक मोठा उत्सव म्हणजे रामनवमीनिमित्त श्रीराम जन्मोत्सव सोहळा. पनवेलच्या चांद्रसेनीय कायस्थ प्रभु समाजातील बांधवांच्या श्रीकृष्ण क्लब ने साधारण शंभर वर्षांपूर्वी श्री राम जन्मोत्सव सो–हळा साजरा करण्यास सुरुवात केली. तेव्हापासून प्रतिवर्षी समाज बांधवांच्या वतीने मोठ्या उत्साहात श्री लक्ष्मीनारायण मंदिरात हा सोहळा साजरा केला जातो.जवळपास पावणे चारशे वर्ष जुने असणाऱ्या या मंदिराचा नुकताच सुप्रसिद्ध उद्योजक राजुशेठ गुप्ते यांच्या पुढाकाराने जीर्णोद्धार संपन्न झाला. श्री लक्ष्मी व श्री नारायण यांच्या मूर्त्यांची प्रतिष्ठापना मोठ्या थाटामाटात संपन्न झाली. अत्यंत सुबक व प्रसन्नतेची अनुभूती देणारे असे हे मंदिर निर्माण झाले आहे. नूतन मंदिरामध्ये प्रथमच श्री राम जन्मोत्सव सोहळा साजरा होत असल्याने समाज बांधव मोठ्या उत्साहाने सोहळ्यात सहभागी झाले होते.

चंद्रसेनिय कायस्थ प्रभू समाजाच्या महिला मंडळाच्या वतीने मध्यान्ह मुहूर्तावर राम जन्माचा पाळणा, भजने, श्रीराम गीते सादर केली जातात. याकरिता वैशाली कुलकर्णी, नीलिमा वैद्य, वैशाली वैद्य, उज्वल दिघे, प्रतिभा हजरनीस, सानिका पत्की, गौरी राजे, नीलिमा गडकरी व त्यांच्या सहकाऱ्यांनी सुश्राव्य गीते सादर केली. त्यानंतर नैवद्य दाखवून प्रभू श्रीरामांची आरती केली जाते. सुंठवड्याचा प्रसाद वाटला जातो,मनोभावे दर्शन घेतल्यानंतर महाप्रसादाचे आयोजन केलेले असते.जकोरोना विषाणू संक्रमणात लादल्या गेलेल्या लॉक डाऊन मुळे गेली दोन वर्षे रामनवमी उत्सव साजरा होत नव्हता. अवघ्या तीन ते चार सदस्यांच्या उपस्थितीत श्रीराम जन्मोत्सवाची औपचारिकता पूर्ण केली जात होती. कोरोना विषाणू प्रसार थांबविण्यासाठी लादलेले निर्बंध हटविले गेल्याने आणि नूतन वास्तूत पहिल्यांदा श्री राम जन्मोत्सव सोहळा होत असल्याने यंदाचा सोहळा आमच्यासाठी दुग्धशर्करा योग असल्याची प्रतिक्रिया चांद्रसेनिय कायस्थ प्रभू समाजाचे अध्यक्ष योगेश राजे यांनी दिली.

ग्लोबल कायस्थ कॉन्फरन्स या समाजाच्या वैश्विक पातळीवर काम करणाऱ्या संघटनेच्या कॉंकलेव्ह करता पनवेल चांद्रसेनीय कायस्थ प्रभु समाजाने दिलेल्या भरीव योगदानाबद्दल ग्लोबल कायस्थ या संस्थेच्या नवीन कुमार, रुचिता सिन्हा आणि विजय सिन्हा यांनी प्रशस्तीपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन चंद्रसेनिय कायस्था प्रभू समाज,पनवेल यांचा गौरव केला. यावेळी अध्यक्ष योगेश राजे, सुप्रसिद्ध उद्योजक राजुशेठ गुप्ते, उपाध्यक्ष नितीन देशमुख, सचिव गिरीश गडकरी, खजिनदार श्रीकृष्ण चित्रे, सहसचिव संदीप देशमुख, सुप्रसिद्ध उद्योजक राजाभाऊ गुप्ते, प्रदीप गुप्ते आदी मान्यवर यांच्यासह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## म्हसळा तालुक्यात रामनवमी उत्साहात आणि आनंदात साजरी




**दै.रायगड नगरी । म्हसळा**

गेल्या दोन वर्षांपासून कोरोनाच्या महामारीत कोणताही सण –उत्सव साजरा करता आला नाही. मात्र दोन वर्षांच्या विश्रांती नंतर ूर वर्षी म्हसळा तालुक्यात रामनवमी अतिशय उत्साही आणि आनंदी वातावरणात संपन्न झाली.

म्हसळा येथील प्रभू राम मंदिरात श्री राम जन्मोत्सव कार्यक्रम संपन्न झाला. विविध धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले. रोहा येथील सुप्रसिद्ध कीर्तनकार श्रीमती सुषमा भावे यांचे प्रभू श्री राम चंद्र यांच्या जीवनावर आधारीत कीर्तन आयोजित करण्यात आले. प्रसंगी हिंदू समाज अध्यक्ष सुभाष करडे, कुंभार समाज अध्यक्ष नंदू गोविलकर, सोनार समाज अध्यक्ष सुनिल उमरोटकर, भालचंद्र करडे, प्रसाद पोतदार, सुरेश कुडेकर, नगरसेवक मुन्ना पानसरे, नगरसेविका राखी करंबे, माजी सभापती महादेव पाटील, ब्राम्हण समाज अध्यक्ष भालचंद्र दातार, गौरी पोतदार आदि मान्यवर उपस्थित होते. तालुक्यातील अमृतेश्वर देवघर येथील श्री साई मंदिर, रेवली येथील श्री साई मंदिर आणि इतर ठिकाणी साई भंडारा चे आयोजन करण्यात आला. तालुक्यातील अनेक भक्तांनी कार्यक्रमांचा लाभ घेऊन कार्यक्रमांची खऱ्या अर्थाने शोभा वाढविली.

## कृषीनिष्ठ बाहे गावच्या शेतकऱ्यांना भाजी मळ्यांनी मिळवून दिले आर्थिक उन्नतीचे स्त्रोत

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

रोहा तालुक्यातील ताज्या व हिरव्या पाले भाज्यांकरिता सुप्रसिद्ध असणाऱ्या व नावलौकिक कमविलेल्या ताज्या भाजीच्या विक्रमी उत्पादनामुळे येथील शेतकऱ्यांना आर्थिक उत्पन्नाचे व उन्नतीचे मोठे स्त्रोत निर्माण करून दिले आहे.

ताज्या भाजीचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बाहे गावच्या शेतकऱ्यांनी संपूर्ण कुटुंबासमवेत अथक परिश्रम घेत अतिशय कष्टाने आपल्या वडिलोपार्जित भातशेतीमध्ये सेंद्रिय खतांचा वापर करून हिरवेगार नंदनवन फुलविलेल्या ताज्या भाजीच्या विक्रमी उत्पादनामुळे येथील शेतकरी वर्गाला मोठाच दिलासा मिळवून मोठे आर्थिक उत्पन्नाचे साधन मिळवून दिले आहे.

बारमाही वाहणाऱ्या कुंडलिका नदीच्या तीरावर मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध होत असल्याने भातशेती बरोबरच कडधान्ये पिके व हिरवीगार मिरची, माठ,पालक,मेथी, वांगी,टॉमोटा, कोबी, कोथंबिर,भेंडी,दुधी, भोपळा, घेवडा,आदी कमी कालावधी मध्ये अधिक उत्पन्न देणारी नगदी पिके येथे पिकविली जात आहेत.



शेतकरी वर्गाच्या हितासाठी आवश्यक असणाऱ्या विविध योजना विशेषतः भाजीपाल्याच्या पिकासाठीच्या योजना तालुका कृषी खाते व एक्सेल इंडस्ट्रीज कंपनीच्या माध्यमातून स्वामी विवेकानंद रिसर्च इन्स्टिटयूट सेंटर यांच्या वतीने राबविल्या जात असल्याने त्याचाही चांगला फायदा शेतकरी वर्गाला होत आहे. वेळोवेळी केलेले माती परीक्षण प्रक्रिया व पाठपुरावा करून शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेत वातावरणीय बदलानुसार कोणती पिके फायदेशीर ठरतील याचे अभ्यासपूर्वक मार्गदर्शक तत्त्वांचे पालन व अवलंबन करीत योग्य मार्गदर्शन केले जात आहे.

अतिशय कष्टाने आपल्या वडिलोपार्जित भातशेती जमिनी मध्ये नैसर्गिकरित्या सेंद्रिय खतांचे वापर करून हिरवेगार नंदनवन फुलविलेल्या ताज्या भाजीच्या विक्रमी उत्पादनामुळे येथील शेतकऱ्यांना आर्थिक उन्नतीचे मोठे स्त्रोत निर्माण झाले आहे असे येथील कृषिनिष्ठ शेतकरी खेळू थिटे,राजेंद्र जाधव, राम देवकर, संतोष थिटे यांनी आमच्या प्रतिनिधींकडे आपले मनोगत व्यक्त केले.

# मनसे माथाडी कामगार चषक क्रिकेट स्पर्धेत साई रामनगर संघ विजेता

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

महाराष्ट्र नवनिर्माण माथाडी कामगार सेना यांच्या वतीने येथील जोगेश्वरी नगर मधील मैदानावर दि. ८ व ९ एप्रिलला संपन्न झालेल्या मनसे माथाडी कामगार चषक २०२२ नाईट अंडर आर्म क्रिकेट स्पर्धेत साई रामनगर, नागोठणे संघाने विजेतेपद मिळविले. तर जय भवानी चिंचवली संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

देवालाई देवी, चिकणी व ओम सेवन स्टार कोळीवाडा यांनी अनुक्रमे तृतीय व चतुर्थ क्रमांक मिळविला. अंतिम सामन्यातील सामनावीर जीवन बेंडकुळे, मालिकाविर मनोज घरत, उत्कृष्ट फलंदाज महेंद्र अंधेरे, उत्कृष्ट गोलंदाज निखिल देवरे, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक श्रीनंदन भिल्लारे यांनाही यावेळी मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.




या स्पर्धेचे बक्षीस वितरण मनसे कामगार सेना महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष राजेश उज्जनकर, मनसे माथाडी कामगार सेनेचे सरचिटणीस राजन शितोळे मनसे कामगार सेना चिटणीस यशवंत हाडगे, माथाडी कामगार रायगड जिल्हा संघटक महेश पंडित, माथाडी कामगार सेना रायगड जिल्हाध्यक्ष संजय गायकवाड, मनसे वाहतूक सेना रायगड जिल्हा उपाध्यक्ष सुबोध जाधव, कल्याण शहर अध्यक्ष पंकज डोईफोडे व गणेश खंडारे या मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. जय हनुमान क्रिकेट क्लब आंगरआळी यांच्या आयोजनाखाली माथाडी कामगार सेना रोहा तालुका अध्यक्ष विनायक तेलंगे व माथाडी कामगार सेना विभाग अध्यक्ष नरेश भंडारी यांच्यावतीने घेण्यात आलेल्या या स्पर्धेच्या उदघाटनाला दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष देवेंद्र गायकवाड, दक्षिण रायगड जिल्हा सचिव अमोल पेनकर माथाडी कामगार सेनेचे जिल्हाध्यक्ष संजय गायकवाड, माणगांव तालुकाध्यक्ष प्रतीक रहाटे, रायगड जिल्हा उपाध्यक्ष रोजगार व स्वयंरोजगार प्रल्हाद पारंगे, मनसे रोहा तालुका सचिव साईनाथ धुळे, माथाडी कामगार सेना तालुका उपाध्यक्ष गोरखनाथ पारंगे, रोहा तालुका महिला सेना सौ. दीपेश्री घासे आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेत विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आपली उपस्थिती दाखवली व विविध माध्यमांनी सहकार्य केले. नरेश भंडारी यांनी स्पर्धेला सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

## शिवणसई येथे श्रीराम जन्मोत्सव सोहळा



**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवणसई –आंबे येथे श्रीराम जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी भाविकांनी श्री रामाचे दर्शन घेण्यासाठी मोठी गर्दी केली होती. सकाळ पासून शिवणसई –आंबे येथे श्रीराम जन्मोत्सवला सुरुवात करण्यात आली. सकाळी किर्तन त्यानंतर भजन, हरिपाठ व पालखी सोहळा आयोजित करण्यात आला होता. तालुका पोलीस ठाण्याचे रवींद्र दौंडकर, शिवसेनेचे एकनाथ म्हात्रे, मनसेच्या अदिती सोनार यांच्यासह अनेक मान्यवरांनी प्रभू श्री रामाचे दर्शन घेतले.


### जाहीर नोटीस

आमचे अशिलांचे वतीने तमाम जनतेस या नोटीसद्वारे असे सुचित करण्यात येते की, माझे अशिल यांनी १) श्री.सोपान नारायण नाईक, २) पांडुरंग गणू नाईक ३) श्री.विशाल गोकुळ नाईक ४) श्री.रोहिदास गोपीनाथ नाईक यांच्या मालकीचा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पबाधितांना पुनःर्वसन व पुनःस्थापना योजनेंतर्गत त्यांना सिडकोच्या साडेबावीस टक्के योजनेनुसार कोल्ही, संचिका क्रमांक KOL-ICOGS-151N, च्या नुसार वाटप होवून सिडकोच्या ताबे पावती नुसार वडघर पुष्पक नोड, सेक्टर क्रं.R1, भूखंड क्रमांक 55 B, एकूण क्षेत्र २९५.९२ चौ.मी. चा भूखंड ताब्यात देण्यात आलेला आहे. या भूखंडाचे सर्व हक्क व अधिकार व फायदे कायमस्वरुपी आमचे मे.ईश्वर डेव्हलपर्स तर्फे भागीदार १) सौ.नलिनी ऊधाब साहू, २) श्री.ऊधाब जयामनी साहू, ३) श्री.खिरासिंधू जयामनी साहू, यांना त्रिपक्षीय कराराने हस्तांतरीत करण्याचे ठरविलेले आहे.

सदर मिळकतीबाबत सदर मिळकतीचे मालक हे आमचे अशिलांचे सोबत भाडेपट्ट्याचे व इतर सर्व हक्क अधिकार हस्तांतरीत करणार आहेत. सदर मिळकती बाबत कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा कार्यालयीन पत्यावर रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीमधील त्यांचा हिस्सा निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक / कब्जेदार यांच्या बरोबर विक्री व हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.११/०४/२०२२

सही/–
**प्रदीप टी. मुंडकर**
**ॲडव्होकेट हायकोर्ट**
**मु.चिंचपाडा, ता.पनवेल,**
**जि.रायगड, पिन नं.४१०२०६**


## पेण येथील डॉ.शेखर धुमाळ यांना आरोग्य भूषण पुरस्कार जाहीर

**दै.रायगड नगरी । पेण**

जनसेवा हीच खरी ईश्वर सेवा या प्रमाणे वैद्यकीय क्षेत्रात अविरत सेवा देणारे व नेहमीच समाजसेवेत अग्रेसर असणारे पेण येथील प्रसिद्ध डॉक्टर शेखर धुमाळ यांना सह्याद्री आरोग्य भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. सदर पुरस्काराचे वितरण विधानसभेचे उप सभापती नरहरी सीताराम झिरवळ यांच्या हस्ते मंगळवार १२ एप्रिल रोजी यशवंत चव्हाण सेंटर, मुंबई येथे होणार आहे.



सदर पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी केंद्रीय आरोग्य राज्य मंत्री भारती पवार, महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, मृद व जलसंधारण मंत्री शंकरराव गडाख, सह्याद्री मल्टिसिटी फायनान्स चेअरमन संदीप थोरात आदींसह अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत. पेण तालुक्यातील जोहे गावातील प्रसिद्ध डॉक्टर शेखर रामदास धुमाळ हे वैद्यकीय क्षेत्राबरोबर विविध सामाजिक उपक्रम राबवित असतात. गोरगरीब रुग्णांसाठी मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया, मूतखडासाठी वेगवेगळ्या उपाययोजना, संधीवातावर अनेक शिबिरे यांसह शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात विविध उपक्रम राबवित असतात. या अविरत सेवेबद्दल डॉ. धुमाळ यांना विविध पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

## श्री रामनवमी जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यात चिरनेर, चिर्ले, फुंडे, दिघोडे येथील श्रीराम मंदिरात मोठ्या भक्तिभावाने, धार्मिक पुजा अर्चा करून श्री रामनवमी जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी अनेक भाविकांनी, ग्रामस्थांनी आप आपल्या कुटुंबासह श्रीरामाचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात गर्दी केली होती.

यावर्षी प्रभु श्रीरामाचा जन्मोत्सव सोहळा रविवार दि१० एप्रिल रोजी सुट्टीच्या दिवशी आल्याने चिर–नेर, फुंडे, चिर्ले, दिघोडे गावातील ग्रामस्थांनी जय्यत तयारी केली होती. श्री रामनवमी जन्मोत्सवा निमित्त चिरनेर येथील मंदिरात राजाशेठ खारपाटील यांच्या कुटुंबीयांकडून श्रीरामाच्या मूर्तींना भक्तिभावाने अभिषेक घालण्यात आले याप्रसंगी काकड आरती, भजन किर्तन, जन्म सोहळा, महाप्रसाद आणि सायंकाळी पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अनेक भाविकांनी ग्रामस्थांनी आप आपल्या कुटुंबासह प्रभु श्रीरामाचे दर्शन घेऊन, महाप्रसादाचा लाभ घेतला.

# संक्षिप्त...

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती सर्वांनी उत्साहात साजरी करावी : विजय कादबाने



**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारतरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकर जयंती सर्वांनी उत्साहात करावी परंतु शासनाकडून निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांचे पालन करावे असे आवाहन पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांनी आयोजित बैठकीत मार्गदर्शन करताना केले .

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या अनुषंगाने पनवेल शहर पोलीस ठाण्यात बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत होणारे कार्यक्रम व निघणाऱ्या मिरवणूकींबाबत उपस्थितांना शासनाकडून निर्गमित करण्यात आलेल्या सूचनां प्रमाणे मार्गदर्शन वपोनि विजय कादबाने यांनी केले. सदर बैठकीत स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंके यांनी सानिगितले की कोरोना काळामुळे मागील दोन वर्ष भीम सैनिकांना जयंती साजरी करता आली नाही परंतु आता शासनाने सर्व निर्बंध दूर केल्या मुले भीम सैनिकांन मध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

त्यामुळे सर्व मंडळांना आंबेडकर जयंती साजरी करण्याकरीता परवानगी देण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली या बैठकीला पनवेल शहरातील पंचशील नगर, नवनाथनगर, करंजाडे, वडघर, ओवळे सह अनेक ठिकाणचे पदाधिकारी, पोलीस पाटील कुणाल लोंढे , राज सदावर्ते याच्या सह इतर मान्यवर उपस्थित होते.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# मिळालेल्या नियुक्तीपत्रांचा वापर फ्रेममध्ये लावण्यासाठी न करता संघटन वाढीसाठी करा : आ. अनिकेत तटकरे

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

राष्ट्रवादी पक्ष संघटनेच्या वाढीसाठी रोहा तालुक्यातच नव्हे तर जिल्ह्यात कुठे होत नसेल एवढे काम माझा नागोठणे विभाग करीत आहे. नागोठणे शहर व विभागात साहेब, ताई व माझ्या माध्यमातून भरपूर निधी देऊन विकासकामांच्या बाबतीत विभागाला नेहमीच झुकते माप दिले आहे. तरीही नागोठणे ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकीत आपल्याला अपयश आले हे दुर्दैव. मात्र आपापसातील मतभेद बाजूला ठेवून काम केले की काय होते हे नागोठणे पोटनिवडणुकीत आपण दाखवून दिले आहे. त्यामुळेच भविष्यातही मिळालेल्या नियुक्तीपत्रांचा वापर फ्रेममध्ये लावण्यासाठी न करता संघटन वाढीसाठी करा असे आवाहन आमदार अनिकेतभाई तटकरे यांनी कार्यकर्त्यांना केले. खा. शरद पवार यांच्या मुंबईतील सिल्व्हर ओक बंगल्यावर झालेल्या हल्ल्याचा निषेध ठरावही यावेळी करण्यात आला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे विभागीय नेते भाई टके यांच्या मार्गदर्शनाखाली शहर अध्यक्ष बाळासाहेब टके व त्यांच्या संपूर्ण टीमकडून आयोजित केलेल्या एका देखण्या कार्यक्रमात खा. सुनील तटकरे यांच्या आशिर्वादाने तसेच ना. आदितीताई व आ. अनिकेतभाई यांच्या सुचनेनुसार शहरातील राष्ट्रवादी, युवक राष्ट्रवादी व महिला अशा ६७ पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्याचा कार्यक्रम येथील हॉटेल



इंद्रप्रस्थच्या सभागृहात शनिवारी(दि.९) सायंकाळी उत्साहात संपन्न झाला त्यावेळी आ. अनिकेतभाई तटकरे बोलत होते. विकास कामांचे प्रस्ताव हे कोणाच्या माध्यमांतून गेलेत हे महत्वाचे असल्याने आम्ही आणलेल्या कामांनाच ती आम्ही आणल्याचे छातीठोकपणे म्हणत असतो. दुसऱ्याच्या बापाला बाप म्हणण्याची आमची पद्धत नाही असा टोलाही यावेळी आ. अनिकेतभाई तटकरेंनी यावेळी विरोधकांना लगावला व उद्धव ठाकरे हे केवळ एक पक्षाचे मुख्यमंत्री नसून ते महाविकास आघाडीचे मुख्यमंत्री असल्याने जोपर्यंत उद्धवजी मुख्यमंत्री आहेत तोपर्यंत आदितीताईच पालकमंत्री राहणार असून मला पेणचा आमदार व्हायचे नसले तरी पेणचा भावी आमदारही राष्ट्रवादीचाच असेल असे सूतोवाचही यावेळी आ. अनिकेतभाई तटकरे यांनी केले.

या कार्यक्रमाला राष्ट्रवादीचे विभागीय नेते भाई टके, शिवरामभाऊ शिंदे, सदानंद गायकर, मधुकर ठमके, हरेष काळे, विलास चौलकर, लियाकतशेठ कडवेकर, बाळासाहेब टके, पांडुरंग गायकर, चंद्रकांत गायकवाड, हिराजी शिंदे, राजेंद्र शिंदे, प्रमोद जांबेकर, सचिन कळसकर, विनायक गोळे, दिनेश घाग, अखलाक पानसरे, अतुल काळे, राजेश पिंपळे, कुणाल तेरडे, सुजाता जवके, प्रितमताई पाटील, आशा शिर्के, अमिता शिंदे, स्नेहल काळे, निष्ठा विचारे, प्रतिभा तेरडे, श्वेता चौलकर, ॲड. सोनल जैन, मेघना कोळी, सुधाकर जवके, बिपीन सोष्टे, प्रकाश मोरे, नितीन पत्की, विक्रांत घासे आदींसह कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात शिवरामभाऊ शिंदे, सदानंद गायकर, विलास चौलकर, सुजाता जवके, प्रितमताई पाटील यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिराजी शिंदे यांनी केले.

# धनुर्धारी मंडळ एकदरा आयोजित श्रीराम जन्मोत्सव सोहळा

## भव्य पालखी सोहळा व चलन चित्राचे आयोजन

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

प्रदीर्घ दोन वर्षाच्या कोरोना कालखंडानंतर मुरुड एकदरा येथील जिल्ह्यातील प्रसिद्ध असलेल्या श्रीराम नवमीनिमित्त निघणारी भव्य चलचित्र देखावा मिरवणूक व पालखी सोहळा धनुर्धारी मंडळ एकदरा वतीने आयोजित करण्यात आले होते. हा सोहळा गेले ५९ वर्षे धनुर्धारी मंडळ एकदरा आयोजित करीत आहेत.

या निमित्ताने राम जन्मोत्सवानिमित्त दिनांक ०९/०४/२०२ रोजी रात्री दहा ते साडे अकरा च्या दरम्यान कीर्तनकार ह. भ. प. परशुराम हाटे महाराज यांचे सुश्राव्य श्रीराम चरित्रावर कीर्तन सादर करण्यात आले.



त्यानंतर रविवार दिनांक १०/०४/२०२२ रोजी पहाटे पाच वाजता श्री रामाच्या मूर्तीला अभ्यंगस्नान घालून काकड आरती करण्यात आली. दुपारी दहा वाजून तीस मिनिटांनी श्रीराम मंदिर एकदरा येथे ह. भ. प. परशुराम हाटे महाराजांनी श्रीराम जन्मोत्सव कीर्तन सादर केले. दुपारी १२:४५ वाजता श्री रामाचा जन्म काळ करण्यात आले व विधीवत अभिषेक, पूजा करून श्री रामाच्या मूर्तीला पाळण्यात ठेवून सुवासिनींच्या हस्ते पाळणा घेण्यात आले. यावेळी उपस्थित सर्व श्रीराम भक्तांनी दर्शनाचा लाभ घेतला.

सायंकाळी पाच वाजता श्रीरामाच्या पालखी चे आयोजन करण्यात आले पालखीसोबत श्री राम व रावण युद्ध देखावा भव्य मिरवणूक एकदरा गावातून काढण्यात आली यावेळी तालुक्यातील असंख्य भाविकांनी हा सोहळा पाहण्यासाठी गर्दी केली होती. ही मिरवणूक एकदरा पुलावरून मुरुड बाजार पेठ, मच्छी मार्केट मार्गे पुन्हा एकदरा गावाकडे येऊन त्याची गावांमध्ये पालखी मिरवणूक फिरवून समारोप करण्यात आले.

# शेकाप कार्यकर्त्यांचा मनसेत पक्ष प्रवेश

**दै.रायगड नगरी । उरण**

उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली उरण तालुक्यातील शेकाप कार्यकर्त्यांचा मनसेत पक्ष प्रवेश केला आहे.

मनसेच्या कोप्रोली येथील कार्यालयात सदर पक्ष प्रवेश कार्यक्रम पार पडला.यावेळी मनसेचे जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर यांनी पक्ष प्रवेश करणाऱ्या कार्यकर्त्यांचे स्वागत केले.

याप्रसंगी उपतालुकाध्यक्ष सत्यवान भगत, राकेश भोईर, रोजगार स्वयंरोजगार जिल्हाउपाध्यक्ष रितेश पाटील, विभागध्यक्ष दिपक पाटील, वाहतूक संघटक कुणाल भगत, पिरकोन गाव अध्यक्ष नितीन पाटील, भार्गव म्हात्रे बबन ठाकूर आणि महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.



# मुरुड समुद्र किनारी दुर्मिळ लॉगहेड समुद्रीकासव आढळले



**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड समुद्र किनारी आज सुमारे तीन फुट लांबीचा कुसलेल्या अवस्थेतील कासव आढळून आले. सदर कासव हा ३० ते ३५ कि. वजनाचा असल्याचा अंदाज वनखात्याने सांगितले आहे. या पूर्वी अनेक मृत कासव या समुद्र किनारी आढळून आले आहेत. हा कासव लॉगहेड जा-तीचा असल्याचे सांगितले आहे. सदर कासव हा कुजलेल्या अवस्थेत असल्या कारणाने त्यांच्या मृत्यूचे कारण समजू शकले नाही. या कासवाला समुद्र किनारी वाळूत खड्डे खोदून पुरण्यात आलें आहे.

लॉगहेड समुद्री कासव, ही सागरी कासवाची एक प्रजाती आहे जी जगभरात पसरलेली आहे. हा एक सागरी सरपटणारा प्राणी आहे, जो चेलोनिडे कुटुंबाशी संबंधित आहे. पूर्ण वाढ झाल्यावर सरासरी लॉगहेड कासवाची लांबीमध्ये सुमारे ९० सेमी पर्यंत वाढ होते. या वजन १६० किलो ग्राम पर्यंत असते. लॉगरहेड्स शेकडो मैल समुद्राच्या बाहेर किंवा किनार्यावरील पाण्याच्या खाडी, खारट दलदल, खाड्या, जहाज वाहिन्या आणि मोठ्या नद्यांच्या मुखांमध्ये आढळतात. कोरल रीफ, खडकाळ ठिकाणी मोठ्या प्रमाणात सागरी जीव आहेत.

# अगोटीला झाली सुरुवात ; पावसाळ्यातील बेगमीची लगबग

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

भारतीय खाद्य संस्कृतीत विविध लज्जतदार पदार्थांना विशेष महत्व आहे. त्यातच पावसाळ्यातील बेगमीसाठी उन्हाळ्यात करण्यात येणाऱ्या विविध पदार्थांची जंत्रीच आहे. कोरोना काळात मागील दोन वर्षे ही लगबग पहायला मिळाली नाही. मात्र आता जिल्ह्यात घराघरात ही लगबग दिसत आहे. तसेच अगोटीला देखील सुरुवात झाली आहे. बाजारात कडधान्य व सुकी मासळी खरेदीसाठी गर्दी वाढत आहे.

उन्हाळ्यात बहुतांश घरात पापड, कुरडया, चिकोड्या, शेवया, फेण्या, सांडगे, लोणची व मसाले या विविध पदार्थांसह वाळवणाचे पदार्थ सामुहिक व वैयक्तिकपणे तयार केले जातात. जिल्ह्यात आजही अनेक घरांमध्ये हि वाळवण संस्कृती जोपासली जात आहे. पापड, कुरडया, चिकोड्या, मिरगुंड, फणस व आंबा पोळी, मसाले, सांडगी मिरची विविध सरबत आदि पदार्थ तयार करण्यासाठी तर गावागावतील महिला गोळा होतात. प्रत्येक महिला आपल्या शेजारणीकडे हे सर्व पदार्थ बनविण्यासाठी विनाशुल्क आनंदाने जाते. मग हे पदार्थ बनवितांना कधी गप्पा रंगतात, तर कधी गाणी गुणगुणली जातात. ज्या घरात हे पदार्थ बनविले जात असतात तिथे महिलांसाठी चहा-नाष्टा आदी दिले जाते. घरातील बच्चे कंपनी देखील त्यांच्या मदतीला सज्ज असतात. तयार पापड, कुरडया, मिरगुंड, फणस व आंबा



पोळी, सांडगी मिरची, लोणची, मसाले असे पदार्थ आप्तस्वकियांसह (नातेवाईक) शेजाऱ्यांना देखिल हौसिने चवीसाठी दिले जातात. हि परंपरा व संस्कृती अजुनही टिकून आहे. याबरोबरच अनेक घरांच्या अंगणात, पडवीत, छतावर, कौलावर किंवा पत्र्यावर कापलेल्या आंब्याच्या फोडी आंबोशी करण्यासाठी ठेवल्या जातात. त्याचबरोबर सुकी मच्छी तसेच कोकम सरबत बनविण्यासाठी बाटल्यांमध्ये कोकम ठेवले जाते. मसाल्यासाठी मिरची येथेच सुकविल्या जातात. पापड, सांडगी, कुरडया, चिकोड्या आदि येथेचे बनविले व वाळविले जातात. अशी हि पावसाळ्याची बेगमी व वाळवण संस्कृती अखंडीतपणे सुरु आहे.

पावसाळ्याच्या चार महिन्यात भाजीपाला व मासळी यांची आवक कमी होते आणि त्यांचे भाव देखिल वधारतात अशा वेळी घरात साठवुन ठेवलेले कडधान्य व सुकी मच्छी म्हणजे सर्वात चांगला पर्याय असतो. मासळीची आवक कमी, डिझेलचे व मजुरीचे वाढलेल्या दरांमुळे यावर्षी सुक्या मासळीचे भाव वाढले आहेत. तर कडधान्याचे भाव देखील वाढले आहेत. गोड व कडवे वाल यांना अधिक मागणी आहे.पावासाळ्यासाठी खेड्या-पाड्यातील अनेक जण या जिन्नसांची खरेदी करत आहेत. महत्वाच्या आठवडा बाजारात खरेदीसाठी लोकांची रेलचेल सुरु आहे.

# महाराष्ट्र शिक्षक पॅनलकडून संतोष शंकर चौधरी (कळंबोली) यांची सेवा सन्मान राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

संतोष शंकर चौधरी हे शामल मोहन पाटील एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष सतीश मोहन पाटील यांच्या न्यू इंग्लिश स्कूल कळंबोली विद्यालयात गेली २१ वर्षे कार्यरत आहेत. त्यांनी शैक्षणिक कार्यात,सांस्कृतिक कार्यात समाजसेवा करण्यात त्याच बरोबर परोपरीने आपल्या सहकाऱ्यांना मदत करण्यात विविध शालेय उपक्रम राबवण्यात सुद्धा उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या या कार्याची जाणीव ठेवून महाराष्ट्र शिक्षक पॅनलकडून संतोष चौधरी (कळंबोली) यांची सेवा सन्मान राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

संतोष चौधरी याना वेळोवेळी त्यांना शाळ-तून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सतीश पाटील, मुख्याध्यापिका रोहिणी पाटील, संचालक -सनी पाटील व तुषार पाटील यांच्याकडून शाबासकीची थाप मिळाली आहे. त्याचबरोबर त्यांना न्यायिक लढा पत्रकार संघ, ठाणे यांच्याकडून शिक्षकरत्न, नवी मुंबई पोलीस आयुक्तालय यांच्याकडून वक्ता दशसहस्त्रेषु अशी अनेक पुरस्कारही त्यांना मिळाले आहेत.

त्याचबरोबर कोरोनाच्या आपत्कालीन परिस्थितीत



सामाजिक बांधिलकीची जपणूक करत गरजूंना उदात्त हेतूने मदत केल्याने आपला मानवता धर्म जपणाऱ्या या कार्याची दखल घेऊन कृतज्ञता व आदर व्यक्त करण्याकरिता आर एस पी युनिट कल्याण-डोंबिवली तर्फे देवदूत म्हणून ही संतोष चौधरी यांना अरविंद देशमुख (महासमादेशक आरएसपी महाराष्ट्र राज्य) आणि डॉ. पवन अग्रवाल (अध्यक्ष आरएसपी महाराष्ट्र) यांच्या उपस्थितीत सन्माचिन्ह देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. त्यांच्या या विविध क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन 'महाराष्ट्र शिक्षक पॅनल' निवड समितीच्या वतीने राज्यस्तरीय आदर्श शिक्षक सेवा सन्मान पुरस्कारासाठी संतोष शंकर चौधरी यांची निवड करण्यात आली आहे.

हा पुरस्कार वितरण सोहळा १५ मे रोजी सिनेसृष्टीतील कलावंत शिक्षक आमदार तसेच प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत अंकुशराव लांडगे सभागृह, पुणे येथे वितरीत करण्यात येणार आहे .आणि तसेच ६ एप्रिल रोजी सुरेश भगवान शिंदे यांच्या हस्ते त्यांना निवड पत्र देण्यात आले व १५ मे रोजी होणाऱ्या कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यात आले. 'महाराष्ट्र शिक्षक पॅनल 'अशा गुणवंत कार्यनिष्ठ व कर्तव्यनिष्ठ गुरुजनांच्या कार्याची दखल घेऊन त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी स्वखर्चाने पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करीत आहे. त्यांच्या या कार्याचे सर्व शिक्षक व अधिकाऱ्यांकडून कौतुक होत आहे.

# चौक नगरीत राम जन्मोस्तव मोठ्या भक्तीभावाच्या उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । चौक**

चैत्र शुद्ध नवमी ला येणारी राम जन्मोत्सव संपूर्ण भारत देशभर मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. प्रभू श्रीराम हे युगानुयुगे अस्तित्वात असणारे नाम आहे.आयोध्यात श्रीरामचंद्रांचे भव्य असे मंदिर बांधण्यास सुरुवात झाल्यापासून संपूर्ण भारतभर प्रभू रामचंद्रांच्या जयघोष सुरू झाला आहे. लहानांपासून थोरांपर्यंत श्रीराम नामाचा जयघोष पाहायला मिळतो आहे.

प्रभू श्रीराम हे केवळ हिंदूंचे दैवत नसून इतर धर्मियांनी रामनामाचे कवने गायली आहेत अशा प्रभू श्रीरामचंद्रांचा जन्मोत्सव चैत्र शुद्ध नवमी रविवार रोजी चौक -- कोल्हापूर पेठ येथील श्रीराम मंदिरात मोठ्या उत्साहाच्या वातावरणात पार पडला आदर्श महिला मंडळ व ग्रामस्थ यांच्या वतीने हे कार्यक्रम सकाळी पाच वाजल्यापासून सुरु झाले होते सकाळी दहा ते बारा श्रीराम जन्मोत्सवावर ह.भ.प. प्रभाकर महाराज सालेकर यांचे श्रीराम प्रभूंचे आचरण त्यांचे मातृ-पितृ प्रेम- बंधुप्रेम व वनवासातील अनेक गोष्टींमुळे कीर्तनात रंग भरला होता कीर्तनात होणारा प्रभू श्री रामचंद्रांचा गजर अंगावर शहारे आणत होता.या कार्यक्रमात विशेष म्हणजे महिलांची उपस्थिती खूप मोठ्या प्रमाणात होती रणरणत्या उन्हाचा त्रास सहन करीत महिला मंदिरात प्रभू रामचंद्रांचे गुणगान ऐकण्यासाठी मोठ्या भक्तीभावाने बसलेल्या पाहायला मिळत होत्या. हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी सुभाष पवार,वसंत मालुसरे, तुळशीदास मालुसरे,दिलीप मोरे, अजय म्हामुणकर,गणेश



पिंगळे, राजेश थोरवे,भूषण म्हामुणकर, बाळ पिंगळे, वारकरी संप्रदायाचे सदस्य,ग्रामस्थ मंडळ, आदर्श मित्र मंडळ, महिला मंडळ यांनी खूप मेहनत घेतली.